M कोर्ट ५८

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 154 Cr.P.C.)

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): बीड **P.S.**(ठाणे): बीड शहर **Year** (वर्ष): 2022

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0134 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 05/08/2022 12:44 वजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): गुरुवार **Date From** (दिनांक पासून): 26/05/2022

**Time Period** (कालावधी): पहर 4 **Date To** ( दिनांक पर्यंत): 26/05/2022

**Time From** (वेळेपासून): 12:24 वजे

**Time To** (वेळेपर्यंत): 12:45 वजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 05/08/2022 **Time** (वेळ): 12:36 वजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद क्र.): 024 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 05/08/2022 12:36 वजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): उत्तर, 1 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): तलाठी सजा पिंपळे तरफ बीड,भाजी मंडई बीड येथील तलाठी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): शंकर किसनराव विटे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1979 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड,बीड शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड,बीड शहर,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9355100100

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | खमर महेमुद शेख | | | 1. व्हीआयपी लन्सचे बाजुला,बीड शहर, बीड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 05/08/2022. मी शंकर किसनराव शिंदे, वय 43 वर्ष, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड मो.नं. 9355100100. मी आज दिनाक 05/08/2022 रोजी सरकार तर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, मी दिनांक 26/05/2022 रोजी एसीबी कार्यालय, बीड येथे हजर असताना तक्रारदार श्री.शिवशंकर महादेव भोसले, वय 34 वर्ष, रा.विद्यानगर पुर्व, बीड ता.जि.बीड यांनी कार्यालयात येवुन त्यांची एका लोकसेवक व त्यांचे करीता काम करत असलेल्या खाजगी इसमा विरुद्ध त्यांचे कामासाठी लाच मागत असले बाबत तक्रार असल्याचे कळविले. त्यानुसार आम्ही तात्काळ राज्य कर आयुक्त, वस्तु व सेवाकर कार्यालय, बीड यांना पत्र देवुन पंच कर्मचारी 1) श्री.एकनाथ सुर्यभान कदम, वय 48 वर्ष, व्यवसाय नौकरी, कर सहायक, वस्तु व सेवाकर कार्यालय, बीड रा.पल्ली ता.जि.बीड 2) श्री.हनुमंत बाबासाहेब घुले, वय 32 वर्ष, व्यवसाय नौकरी, कर सहायक, वस्तु व सेवाकर कार्यालय, बीड रा.केळगाव ता.केज जि.बीड यांची सेवा उपलब्ध करुन घेतली. शासकीय पंच कार्यालयात आल्यानंतर आम्ही पंचाचा परिचय करुन घेवुन आमचा, सापळा पथकातील अंमलदार यांचा व तक्रारदार शिवशंकर भोसले यांचा परिचय करुन दिला. तक्रारदार शिवशंकर भोसले यांनी सांगितलेली तक्रार संगणकावर टंकलिखीत केली, ती पुढीलप्रमाणे मी दिनांक 08/10/2020 रोजी सम्नापुर शिवारातील शेत गट नंबर 82 मध्ये नवनाथ शिराळे, सय्यद महेताशामअली, ईश्वरलाल टेकवाणी व प्रेमचंद टेकवाणी यांचे कडुन दोन प्लट खरेदी केलेले आहे. त्यानंतर मी सम्नापुर शिवारातील गट नंबर 82 ची 7/12 ऑनलाईन काढली तेव्हा त्या 7/12 वर माझे नाव दिसले नाही. त्यामुळे मला कळले की, मी खरेदी केलेल्या प्लटचा तलाठी बीड पिंगळे तर्फ यांनी फेर घेतलेला नाही. सदर प्लटचा फेर घेण्यासाठी मी खरेदीखताची झेरक्स काढुन घेवुन दिनाक 20/05/2022 रोजी भाजी मंडई येथील तलाठी सजा बीड पिंगळे येथे गेलो. तेव्हा तेथे माझी व तलाठी घोडके साहेब यांची भेट झाली नाही. तलाठी सजा बीड पिंगळे कार्यालयातील तलाठी यांचे कामकाज पाहणारे खाजगी ईसम खमर पुर्ण नाव माहिती नाही हे मला तेथे भेटले. त्यांना मी माझ्या खरेदी केलेल्या प्लट ची रजिस्ट्रीची झेरक्स देवुन फेरची नोंद घेण्यासाठी सांगितले. त्यावेळी तलाठी सजा बीड पिंगळे येथे काम करणारे खाजगी ईसम यांनी मी खरेदी केलेल्या प्लटचा फेर ओढण्यासाठी 3000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यावर मी त्यांना 3000/- रुपये हे शासकिय फीस आहे आहे का ? असे विचारले असता तलाठी कार्यालय बीड पिंगळे मधील खमर यांनी मला 3000/रु दिले नाहीत तर माझे काम करणार नसल्याचे त्यांनी मला सांगितले आहे. मला तलाठी त्यांच्या हाताखाली काम करणारा खाजगी व्यक्ती खमर यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी आपणाकडे तक्रार देत आहे. मी आज रोजी माझे कामा करीता तलाठी घोडके साहेब व तलाठी यांच्या हाताखाली काम करणारे खाजगी इसम खमर यांची भेट घेणार असून माझे कामाबाबत बोलुन काही रक्कम कमी करणे बाबत विनंती करणार आहे. त्यावेळी मला तलाठी घोडके अथवा तलाठी यांचे हाताखाली काम करणारे खाजगी इसम खमर हे जेवढ्या रक्कमेची मागणी करतील तेवढी रक्कम मी उपलब्ध करील. माझी तलाठी घोडके व तलाठी त्यांच्या हाताखाली काम करणारा खाजगी इसम खमर यांचेशी पुर्व दुश्मनी किंवा पैसे देणे-घेणेचा व उसनवारीचा व्यवहार नाही. तरी मला लाच मागणारे

यांचे विरुद्ध कायदेशीर कारवाई करावी. वगैरे मजकुराची तक्रार दिली. सदर तक्रारीवर तक्रारदार भोसले, पंच व मी सही केली.तक्रारदार शिवशंकर भोसले यांचे तक्रारीचे अनुषंगाने तक्रारदार शिवशंकर भोसले व पंच क्र.1 एकनाथ कदम यांना भाजी मंडई येथील तलाठी कार्यालय, तलाठी सजा बीड पिंगळे येथे पाठवुन लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरले. त्यानुसार तक्रारदार शिवशंकर भोसले व पंचांना लाच मागणी पडताळणी कारवाई संदर्भाने आवश्यक त्या सुचना दिल्या. व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देवुन तक्रारदार शिवशंकर भोसले व पंच क्र. 1 श्री.कदम यांना लाच मागणी पडताळणी कामी 12.24 वा. भाजी मंडई येथील तलाठी कार्यालय, तलाठी सजा बीड पिंगळे येथे तक्रारदार यांचेकडील मोटार सायकलने रवाना केले. त्यानंतर तक्रारदार शिवशंकर भोसले व पंच क्र. 1 श्री.कदम हे 12.45 वा.लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बीड येथे परत आले. त्यावेळी पंच क्र. 1 श्री.कदम व तक्रारदार शिवशंकर भोसले यांना स्वतंत्रपणे विचारपुस करता, त्यांनी त्याबाबत सांगितले की, आपले सुचनेवरुन आम्ही भाजी मंडई येथील तलाठी कार्यालय, तलाठी सजा बीड पिंगळे येथे गेलो. तेथे तलाठी घोडके साहेब हजर नव्हते. कार्यालयात तलाठी यांचे काम करणारे खाजगी इसम खमर हे हजर होते. तसेच तक्रारदार शिवशंकर भोसले यांचेवतीने बोलण्यासाठी आलेले हानुमान दिवे हे देखील तेथे हजर होते. तक्रारदार व खाजगी ईसम खमर यांचेमध्ये तक्रारदार यांच्या कामाविषयी चर्चा सुरु झाली. त्यावेळी हानुमान दिवे यांनी खाजगी ईसम खमर यांना तक्रारदार यांचे काम करुन टाका असे म्हणाले. त्यावेळी खाजगी इसम खमर यांनी करतोना..ते बाकीच नाही सांगितल का त्यांना औषध पाणी गोळ्या असे म्हणाले. खा.ई.खमर यांनी तक्रारदार श्री.शिवशंकर भोसले यांना तक्रारदार यांच्या वतीने बोलणारे हनुमान दिवे यांना रक्कम सांगण्यास सांगितली. परंतु हानुमान दिवे यांनी तुम्हीच सांगा म्हणुन सांगितले. त्यावेळी खा.ई.खमर यांनी हे रजिस्ट्री 2020 ची असुन दोन प्लटचे फेर घ्यायचे आहेत. असे म्हणुन कलक्युलेटर वर 3000/- रुपये आकडा टाईप करुन 3000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार यांनी 3000/- जास्त होतील, काही रक्कम कमी करण्याविषयी विनंती केली असता, खा.ई.खमर यांनी दोन घेतोत आम्ही रनींगच्या कागदाला.. एकाला...पुन्हा टक्स वेगळा भरुन घेतोत असे म्हणुन फेरफारची नोंद तलाठी यांचे कडुन करुन घेण्यासाठी 3,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम सोमवारी घेवुन येण्यास सांगितली. अशी हकिगत सांगीतली. एकंदरीत लाचमागणी पडताळणी दरम्यान तक्रारदार शिवशंकर भोसले व पंच क्र.1 कदम यांना स्वतंत्रपणे विचारपुस करता व व्हाईस रेकॉर्डरमधील तक्रारदार शिवशंकर भोसले व खाजगी इसम खमर यांचेत पंचासमक्ष झालेले संभाषण ऐकले असता, तलाठी यांचे हाताखाली काम करणारे खाजगी इसम खमर यांनी तक्रारदार शिवशंकर भोसले यांनी खरेदी केलेल्या प्लटची फेरफारची नोंद तलाठी सजा बीड पिंगळेचे तलाठी यांचेकडुन करुन देण्यासाठी 3,000/-रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. खाजगी इसम खमर यांनी तक्रारदार शिवशंकर भोसले यांना लाच रक्कम 3,000/- रुपये घेवुन सोमवारी घेवुन बोलविल्याने खाजगी ईसम खमर यांनी मागितलेल्या लाच रक्कमेस तलाठी घोडके यांची सहमती आहे किंवा कसे ? याची पडताळणी व सापळ्याचे आयोजन सोमवारी दिनांक 30/05/2022 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरले व झालेल्या कारवाई बाबत गोपनियता बाळगण्याची सुचना सर्वांना देऊन तसेच तक्रारदार शिवशंकर भोसले यांना दिनांक 30/05/2022 रोजी सकाळी 10.30 वा.लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बीड येथे हजर राहणे बाबत कळविले. तसा दिनांक 26/05/2022 रोजी सविस्तर लाचमागणी पंचनामा करण्यात आलेला आहे. त्यानंतर आम्ही दिनांक 30/05/2022 रोजी तक्रारदार यांना फोन लावला असता त्यांनी ते आजारी असल्याचे कळवुन नंतर येतो असे कळविले. त्यानंतर तक्रारदार यांना वारंवार फोन केला असता त्यांनी आजारी असल्याचे कारण सांगुन पुढील कार्यवाही करण्यासाठी टाळाटाळ केली. त्यानंतर तक्रारदार शिवशंकर भोसले यांनी दिनांक 06/06/2022 रोजी ला.प्र.वि.बीड येथे हजर येवुन त्यांची तक्रार नसले बाबत लेखी कळविले. सदर प्रकरणात वरिष्ठांचे मार्गदर्शन घेवुन त्यांचे प्राप्त निर्देशाप्रमाणे कारवाई केली आहे.तरी एकंदर लाचमागणी पडताळणी दरम्यान दिनांक 26/05/2022 रोजी चे 12.24 ते 12.45 वा. चे दरम्यान भाजी मंडई बीड येथील तलाठी कार्यालय, तलाठी सजा बीड येथे यातील तलाठी यांचे मदतणीस खाजगी इसम खमर यांनी तक्रारदार शिवशंकर भोसले यांचेकडे त्यांनी खरेदी केलेल्या प्लटची फेरफारची नोंद तलाठी सजा बीड पिंगळेचे तलाठी यांचेकडुन करुन देण्यासाठी 3,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य करुन लाच रक्कम मिळवण्याचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाले आहे. तक्रारदार शिवशंकर भोसले यांनी फिर्याद देण्यास असमर्थता दर्शवली आहे, म्हणुन माझी खाजगी इसम शेख खमर शेख महेमुद, वय-48 वर्ष, व्यवसाय खाजगी मदतनीस तलाठी सजा पिंगळे तरफ, बीड रा.व्ही.आय.पी. लन्सचे बाजुला, अदित्य कलेज, तेलगाव नाका, बीड यांचे विरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम-1988 चे कलम 7 -अ प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे. ही फिर्याद संगणकावर टंकलिखीत केली, ती बरोबर व खरी आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): RAVI SHRIHARI SANAP(I (Inspector)) / PI **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिकाऱ्याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची

पोलीस ठाणे बीड शहर

**Name** (नाव): RAVI SHRIHARI SANAP

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI